प्रेसनोट

दिनांक –२३/०९/२०२१

श्री. गंगाराम जयराम जाधव, वय ७० वर्षे, सेवानिवृत्त ग्रंथपाल, वसई विरार शहर महानगरपालिका, यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे (कॅम्प पालघर) यांनी घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे (कॅम्प पालघर) |
| २ | पोलीस ठाणे | वसई पोलीस ठाणे, मिरा भाईंदर वसई विरार आयुक्तालय |
| ३ | गु.रजि.नं. व कलम | ३३५/२०२१ भ्र.प्र.अधि.१९८८ चे कलम ७ (अ) प्रमाणे |
| ४ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आरोपी गंगाराम जयराम जाधव, वय ७० वर्षे, सेवानिवृत्त ग्रंथपाल, वसई विरार शहर महानगरपालिका, राहणार– २०२, राधिका पॅलेस, दुसरा माळा, घाटी आळी, वसई पश्चिम, जि.पालघर |
| ५ | मागितलेल्या लाचेची रक्कम | २५,०००/–रूपये. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | २५,०००/– रुपये |
| ७ | थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार हे व्यवसायाने चार्टर्ड अकाउंन्टन्ट असून त्यांचे अशिलाच्या वतीने सावकारी परवाना मिळण्यासाठी आपले सरकार पोर्टल मार्फतीने उप निबंधक, सहकारी संस्था कार्यालय वसई येथे अर्ज दाखल केला होता. त्याचा पाठपुरावा करण्यासाठी तक्रारदार हे सदर कार्यालयात गेले असता यातील आरोपीत खाजगी ईसम गंगाराम जयराम जाधव यांनी सदर कार्यालयात तक्रारदार यांना भेटून तक्रारदार यांच्यावर प्रभाव पाडून परवान्याचे काम करून देण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे ३०,०००/–रूपये लाचेची मागणी केली. परंतु तक्रारदार यांना श्री.जाधव यांनी मागणी केल्याप्रमाणे लाचेची रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने तक्रारदार यांनी दिनांक २२/०९/२०२१ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कॅम्प पालघरकडे श्री. गंगाराम जाधव यांचे विरूध्द लेखी तक्रार दिली आहे.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक २३/०९/२०२१ रोजी तक्रारदार यांना आरोपी श्री.गंगाराम जाधव यांनी सांगितलेल्या हॉटेल नायक येथे पंचासह पाठवून पडताळणी केली असता, आरोपी श्री.गंगाराम जाधव यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे कामाचे अनुषंगाने २५,०००/–रू. लाचेची मागणी करून लागलीच दिनांक २३/०९/२०२१ रोजीच्या पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनाम्यात श्री.गंगाराम जाधव यांनी सदर लाचेची रक्कम १२:४९ वा. च्या सुमारास हॉटेल नायक, पारनाका वसई पश्चिम येथे स्विकारली असता त्यांना ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे, (कॅम्प पालघर) कार्यालयाचे सापळा पथकाकडून रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे (कॅम्प पालघर) यांचेशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे (कॅम्प पालघर) पालघर प. ४०१ ४०४.
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– dypacbpalghar@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– ––
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :– 1064
दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297
व्हॉट्स अॅप क्र. :– 9923346810 , 8007290944

(स्वपन बिश्वास)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
ठाणे (कॅम्प पालघर)

Scanned with CamScanner